# प्रतिज्ञापत्र

या संशोधन अहवालात समाविष्ट करण्यात आलेले संशोधन कार्य हे कोणाच्याही मदतीशिवाय माझ्या स्वतःच्या प्रयत्नाचे फलित आहे. त्यासाठी मला माझ्या मार्गदर्शकाकडून मिळालेले मार्गदर्शन आणि यापूर्वी झालेल्या संशोधनाचे संदर्भ, याशिवाय कशार्चीही मदत घेण्यात आलेली नाही. उपयोगात आणलेल्या संदर्भांचा योग्य निर्देश करण्यात आलेला आहे असे मी प्रतिज्ञापूर्वक घोषित करतो. सदर संशोधन अथवा त्याचा भाग कोणत्याही पदवी अथवा पदविकेसाठी या व दुसऱ्या कोणत्याही विद्यापीठास सादर केलेला नाही.

(श्री. चंद्रकांत सदाशिव उलभगत)
एम.ए., एम.एड.

स्थळ : सांगली

दिनांक : 04/08/2008

# प्रमाणपत्र

**श्री. चंद्रकांत सदाशिव उलभगत** यांनी ***'माध्यमिक स्तरावरील भूगोल विषयाच्या पाठ्यपुस्तकात अंतर्भूत असणाऱ्या गाभाभूत घटकांचा चिकित्सक अभ्यास'*** या विषयावरील शोधप्रबंध माझ्या मार्गदर्शनाखाली समाधानकारकरित्या पूर्ण केला आहे. हे संशोधन म्हणजे एक प्रामाणिक प्रयत्न असून सदर संशोधन अथवा त्याचा भाग इतर कोणत्याही पदवी अथवा पदविकेसाठी या व दुसऱ्या कोणत्याही विद्यापीठास सादर केलेला नाही.

प्रस्तुत शोधप्रबंध शिक्षणशास्त्र शाखेतील एम.फिल. या पदवीसाठी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यास सादर केला म्हणून हे प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

RBS

**मार्गदर्शिका**
**(डॉ.सौ. रेखा भानुदास टोपकर)**
एम.ए., एम.एड., एम.फिल., पीएच.डी.
प्राचार्या,
श्रीमती पुतळाबेन शाह शिक्षणशास्त्र
महाविद्यालय, सांगली

स्थळ : सांगली

दिनांक : 05/06/2008

# ऋणनिर्देश

*कोणतेही कार्य यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी मार्गदर्शन, प्रेरणा यांची आवश्यकता असते. त्याप्रमाणे माझ्या या शोधप्रबंधासाठी शिक्षणशास्त्र विभागातील सर्व शिक्षक प्रशिक्षकांनी मार्गदर्शन, सहकार्य व प्रेरणा दिली त्याबद्दल मी सर्वांचा ऋणी आहे.*

*माझ्या मार्गदर्शिका डॉ. सौ. आर. बी. टोपकर, प्राचार्य, श्रीमती पुतळाबेन शाह शिक्षणशास्त्र महाविद्यालय, सांगली यांचे बहुमोल असे मार्गदर्शन, अनुभव व ज्ञान यामुळे हा शोधप्रबंध मला व्यवस्थितपणे व तर्कसंगतदृष्ट्या सादर करता आला. मी त्यांचा मनःपूर्वक आभारी आहे.*

*या शोधप्रबंधासाठी सोलापूर जिल्ह्यातील सांगोला तालुक्यातील माध्यमिक शाळेत इयत्ता नववीला भूगोल विषय शिकविणाऱ्या शिक्षकांचे साधनसामुग्री गोळा करण्यासाठी सहकार्य मिळाले, त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.*

*तसेच या संशोधनासाठी वापरण्यात आलेली साधने प्रमाणित करण्यासाठी ज्या तज्ज्ञ व्यक्तींनी सहकार्य केले त्याबद्दल त्यांचे मी आभार मानतो. त्याबरोबर श्रीमती काशिबाई नवले कॉलेज ऑफ एज्युकेशन, कमलापूरचे प्राचार्य, सहकारी स्टाफ व ग्रंथपाल यांनीही या संशोधन कार्यासाठी सहकार्य केले त्याबद्दल मी त्यांचाही ऋणी आहे.*

*त्याचबरोबर हे संशोधनकार्य यशस्वीरित्या पूर्ण करण्यासाठी शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य के. के. यादव व सर्व स्टाफ व शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे ग्रंथपाल श्री. घुटे यांनी मदत व सहकार्य केले. त्याबद्दल मी या सर्वांचा ऋणी आहे.*

*तसेच हा शोधप्रबंध पूर्ण करण्यासाठी माझे आई-वडील अशिक्षित असूनही त्यांनी प्रेरणा व प्रोत्साहन दिले त्याचबरोबर माझी पत्नी सौ. शितल हिचे वेळोवेळी सहकार्य व प्रेरणा मिळाली*

*त्याबद्दल मी सर्वांचा ऋणी आहे. तसेच श्री. बुरांडे यांनी टायपिंगचे काम वेळेत व आकर्षक करून दिले त्याबद्दल मी त्यांचाही आभारी आहे.*

*शेवटी माझा हा शोधप्रबंध पूर्ण करण्यासाठी ज्यांचे प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे सहकार्य लाभले त्या सर्वांचे मी मनःपूर्वक आभार मानतो.*

**संशोधक**
**श्री. चंद्रकांत सदाशिव उलभगत**

**स्थळ :** सांगली

**दिनांक :** 05/06/2008